# बंद घराचे कुलूप तोडून चोरी

**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** नेवासा-उस्थळ रस्त्यावरील मारुतीनगर येथील राम एकनाथ कदम यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून, भर दुपारी अज्ञात चोरट्यांनी १० ग्रॅम सोन्याच्या दागिण्यांसह १६ हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन कपाटाची व बेडमधील सामानाची उचका पाचक करुन कपाटात ठेवलेले ४ ग्रॅमची गळ्यातील पोत व मणी, ३ ग्रॅम कानातील टॉप्स, १ ग्रॅम कानातील बाळी, २ ग्रॅम गळ्यातील ओम आदी दागिण्यांसह १६ हजार रुपये रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा करण्याचे काम सुरु होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

# नारायणगिरी महाराज आश्रमातील सप्ताहाची उद्या सांगता

**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** सद्गुरु ब्रह्मलिन नारायणगिरी महाराज यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीसद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रम आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची उद्या शुक्रवार दि. ९ मे रोजी महंत उद्धव महाराज मंडलिक यांचे काल्याच्या कीर्तनाने सांगता होत आहे. दि.०८ रोजी रात्री ७ वाजता युवराज महाराज देशमुख यांचे कीर्तन होणार आहे. तर शुक्रवार दि.९ रोजी सकाळी सकाळी १० वाजता महंत उद्धव महाराज मंडलिक यांचे काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होईल.



## महत्त्वाचे

### दूध उत्पादकचे राहिलेले अनुदान वर्ग करावे- शेळके

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील दुध उत्पादकचे राहीलेले अनुदान तातडीने वर्ग करावे, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शेळके यांनी केली. मागील वर्षी शेतकरी संघटना व दुध उत्पादक यांच्यावतीने ४० रूपये दर मिळावा याकरीता अंदोलन छेडले होते. त्याची दखल घेऊन दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे यांनी ५ रूपये अनुदान देण्याचे जाहीर करून परीपत्रक काढले. परंतु गेल्या अनेक महिन्यापासून काही तालुक्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही. पशुखाद्याचा इतर खर्च भरमसाठ वाढले. आज कुठल्याही शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शासनाने राहिलेले अनुदान त्वरीत वर्ग करावे, नाहीतर एक तर दुध उत्पादन खर्चावर किमान ४० रूपये दर जाहीर करावा अन्यथा या प्रश्नावर राज्यात तीव्र अंदोलन छेडले जाईल, असे श्री. शेळके यांनी प्रसिद्धीपत्रकात दिला आहे.

### राहाता बाजार समितीत डाळिंब १५५ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत बुधवारी डाळिंबाला प्रतिकिलोला १५५ रुपयांचा भाव मिळाला. डाळिंबाच्या ८२ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर एकला ९१ ते १५५ रुपये प्रति किलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर दोनला ६१ ते ९० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर तीनला ३१ ते ६० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर चारला १० ते ३० रुपये भाव मिळाला. ज्वारीची ३ क्विंटल आवक झाली ज्वारीला सरासरी १९७८ भाव मिळाला. सोयाबीनची ९ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला सरासरी ३९९० रुपये भाव मिळाला. हरभरा ३ क्विंटलची आवक झाली. हरभऱ्याला हरभरा ३९९० रुपये, भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

### निवडणुकांसंदर्भात सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे आनंद द्विगुणित- भुजबळ

**राहाता (वार्ताहर)–** ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सकारात्मक निर्णयामुळे समाजात आनंदाची लाट उसळली आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. ओबीसी समाजासाठी हा ऐतिहासिक क्षण असल्याचे समता परिषदेचे नेते छगन भुजबळ यांनी सांगितले. या निर्णयामुळे खूप आनंद झाला आहे. आमचे आरक्षण सातत्याने कमी होत चालले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमुळे आता पूर्वीप्रमाणेच ओबीसी आरक्षण कायम राहणार आहे, असे भुजबळ म्हणाले. समता परिषदेच्या वतीने आम्ही सर्वोच्च न्यायालयात वकील उभे केले. त्याचा सकारात्मक परिणाम आज आपल्यासमोर आहे. निवडणुकांप्रमाणे आता आमच्या आरक्षणाचा मार्गही मोकळा झाला आहे. जातीनिहाय जनगणना व ओबीसी आरक्षण ही दोन आनंददायक घटना एकत्र आल्याने आमचा आनंद द्विगुणित झाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जात गणनेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. तसेच ओबीसी समाजाला न्याय दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचेही भुजबळ यांनी आभार मानले.

# हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांचा राजीनामा

## अंतर्गत वादाला कंटाळून अध्यक्षांकडे दिलेल्या राजीनाम्यावर आजच्या बैठकीत होणार निर्णय

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख शैक्षणिक संस्था असलेल्या हिंद सेवा मंडळाच्या संचालक मंडळातील अंतर्गत वादाला कंटाळून संस्थेचे मानद सचिव संजय दादा जोशी यांनी तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यावर निर्णय घेण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी संचालक मंडळाची तातडीची बैठक आज गुरूवार दि. ८ रोजी सायंकाळी पाच वाजता बोलवली आहे. या बैठकीमध्ये जोशी यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय होणार आहे.



हिंद सेवा मंडळ सध्या शताब्दी वर्ष साजरा करीत असून संस्थेच्या जिल्ह्यात अहिल्यानगर, श्रीरामपूर, मिरजगाव, अकोले आदी ठिकाणी शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. या सर्व शाखांमधून चांगला कारभार चालू असताना अहिल्यानगर शहरातील संस्थेची जागा मूळ मालकाला परत करण्याबाबत मागील काही दिवसापासून वाद सुरू आहेत. यावरून संस्थेच्या संचालक मंडळात दोन गट पडले आहेत. विद्यमान संचालक मंडळाने बहुमताने सदरची जागा मूळ मालकाला परत करण्याचा निर्णय घेतला आहे. तसा ठराव एकमताने संस्थेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेला आहे परंतू याला संचालक मंडळातील ब्रिजलाल सारडा व इतर काही सदस्यांचा विरोध आहे.

सदर जागेच्या व्यवहारापोटी संस्थेला पाच कोटी रुपये देखील प्राप्त झाले आहेत. या रकमेतून संस्थेच्या इमारती उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. यावरून ब्रिजलाल सारडा व अजित बोरा या दोन विद्यमान संचालकांमध्ये ३ मे रोजी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी होऊन हमरातुमरी झाली होती. तसेच एकमेकाचा बाप दाखवण्यापर्यंत मजल गेली. वाद वाढत गेल्याने मानद सचिव जोशी यांनी ती सभा तहकूब केली. परंतू त्याची जिल्ह्यात मोठ्या प्रमणावर चर्चा झाल्याने शेवटी कंटाळून संजय जोशी यांनी आपल्या मानद सचिव पदाचा राजीनामा संस्थेचे अध्यक्षांकडे पाठवून दिला. त्यामुळे संस्थेतील मतभेद उघड झाल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक वर्तुळात तो एक चर्चेचा विषय झाला आहे.

मानद सचिव संजय जोशी यांचा राजीनामा मंजूर झाला तर त्याचा संस्थेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे. संस्थेची निवडणूक बिनविरोध करण्यामध्ये संजय जोशी यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर मोठी परंपरा असलेल्या या शैक्षणिक संस्थेच्या संचालक मंडळातील सर्व ज्येष्ठांचा मान राखत सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे काम श्री. जोशी यांनी केले आहे. विद्यमान संचालक मंडळाची मुदत २०२७ पर्यंत आहे. त्यामुळे सारडा आणि बोरा हे देखील तोपर्यंत संचालक आहेत. इथून पुढे जर प्रत्येक बैठकीमध्ये वाद होणार असतील तर संस्थेचे कामकाज करणे कठीण होणार आहे. त्यामुळे या वादाला कंटाळून जोशी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान आज होणाऱ्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये संजय जोशी यांचा राजीनामा एकमताने फेटाळण्यात यावा, त्याचबरोबर ब्रिजलाल सारडा व अजित बोरा यांच्या सारख्या ज्येष्ठ लोकांनी हा प्रश्न प्रतिष्ठेचा न करता संस्थेच्या हितासाठी दोन पावले मागे येऊन संस्थेचे हित पहावे आणि आपल्या या मतभेदाचा परिणाम संस्थेच्या कामकाजावर होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी मंडळाच्या अनेक सभासदांनी व बहुतांश संचालकांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी संस्थेचे अध्यक्ष मोडक यांना पत्र पाठवले असून त्यामध्ये हिंदसेवा मंडळाच्या एकूण कारभारामध्ये आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्यांच्या कार्याचा उल्लेख केला आहे. ब्रिजलाल सारडा असो किंवा अजित बोरा किंवा इतर संचालक या प्रत्येक व्यक्तीने आपल्या कार्याने संस्थेचे नावलौकिक वाढवला आहे. परंतू सध्या निर्माण झालेले मतभेद हे संस्थेच्या नावलौकीकास शोभणारे नाहीत. त्याचबरोबर संजय जोशी यांच्यासारख्या अजातशत्रू व्यक्तीने जर राजीनामा दिला तर संस्था डबघाईला येण्यास वेळ लागणार नाही अशी भीती व्यक्त करून संजय जोशी यांचा राजीनामा आजच्या बैठकीत फेटाळण्यात यावा, अशी मागणी मंडळाचे सहसचिव अशोक उपाध्ये व भि. रा. खटोड कन्या विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळे यांनी केली आहे. माजी अध्यक्ष मधुसुदन मुळे यांनीही जोशी यांचा राजीनामा स्विकारला तर त्याविरुध्द भूमिका घेण्याचा इशारा दिला आहे.

# शिर्डीत गुटखा गोडावूनवर पोलिसांचा छापा

## चार लाखांचा मुद्देमाल जप्त; एका आरोपीस अटक

**शिर्डी (प्रतिनिधी)–** शिर्डी शहरात दुहेरी हत्याकांडानंतर शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी शहर गुन्हेगारीला आळा बसविण्यात यश मिळवले असून बुधवारी शिर्डी पोलीस आणि अन्न औषध प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करत चार लाख रुपये किमतीचे गुटख्याचे १२४२ बॉक्स आरोपीच्या घरातून जप्त केले असून शिर्डी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बुधवारी सकाळी शिर्डी पोलीस आणि अन्न औषध प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने एअर पोर्ट रोडवर असलेल्या गणेशवाडी परिसरातील आशिष खाबिया यांच्या आनंद निवास्थानी छापा टाकत पावणे चार लाख रुपयांचा गुटखा जप्त केला. यावेळी घरातील हॉलमध्ये हिरा पान मसाला, आर.एम.डी, डायरेक्टर अशा विविध कंपन्यांचे एकूण १२४२ बॉक्समध्ये विविध प्रकारचा गुटखा मिळून आला आहे. पोलिसांनी हा गुटखा हस्तगत केला असुन आरोपीस अटक करण्यात अली आहे.

या कारवाईत लाखो रुपयांचा गुटखा असल्याचे समजते. यामध्ये कारवाई जरी प्रत्यक्षात आरोपी खाबिया याच्यावर करण्यात आली असली तरी यामागील मुख्य सूत्रधार शिर्डी शहरातील दुसराच असल्याची चर्चा आहे. गणेशवाडी परिसरात गजबजलेल्या मध्यवर्ती रहिवासी भागात एवढया मोठ्या प्रमाणात घरामध्ये अशाप्रकारे अवैध गुटखा आढळून आला असुन या कारवाईने एकच खळबळ उडाली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रणजित गलांडे आणि अहिल्यानगर अन्न औषध प्रशासन विभागाचे श्री. बढे करीत आहे.

# पाकसदृष्य झेंडा आढळल्याने वाकडीत तणाव

## झेंडा जाळून ग्रामस्थांनी केला निषेध

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता तालुक्यातील वाकडी गावातील मुस्लिम कब्रस्थान मधील एका उंच लिंबाच्या झाडाला पाक सदृश असलेला झेंडा आढळून आल्याने गावात तणाव निर्माण झाला होता.





घटनेची माहिती श्रीरामपूर तालुका पोलीस व गुप्तचर यंत्रणेला समजताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. झेंडा असलेल्या ठिकाणी पोलिसांनी धाव घेऊन तेथील तरुणांना झेंडा खाली काढण्यास सांगितला. झेंडा खाली काढल्यावर पोलिसांनी ताब्यात घेतला. तो झेंडा पोलिस घेऊन जात असताना वाकडी येथील संतप्त ग्रामस्थ व तरुणांनी पोलिसांची गाडी अडवून हा झेंडा गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाळून भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद च्या घोषणा दिल्या. यानंतर सर्वांनी घडलेल्या घटनेचा तीव्र संताप व्यक्त करत निषेध सभा घेण्यात आली.

यावेळी विठ्ठलराव शेळके, रामभाऊ शेळके, बापूसाहेब लहारे, अनिल शेळके, महेश लहारे, महेश जाधव, बाळासाहेब आहेर आदींनी संतप्त भावना व्यक्त केल्या. जम्मू काश्मीर मधील पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदूंना मारले. त्या निर्दयी व नीच घटनेचा पुन्हा निषेध करून सदरील झेंडा वाकडी सारख्या गावात आढळून आल्याने ग्रामस्थ आता चांगलेच आक्रमक झाले आहे. वाकडी गावात हा झेंडा आला कुठून, हा झेंडा इथं लावला कोणी या सर्वांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन पोलिसांना देऊन कारवाई न झाल्यास आंदोलनचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# श्रीराम तरुण मंडळ, मर्चंट असोसिएशन व रिपाइंकडून ऑपरेशन ‘सिंदूर’ चा जल्लोष



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** जम्मू काश्मीर येथील पैलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप २५ भारतीय पर्यटकांची त्यांच्या कुटुंबासमोर हत्या केली होती. त्या हत्याचा बदला भारतीय सैनिकांनी पाकिस्तानमध्ये घुसून ९ दहशतवादी केंद्रांवर ऑपरेशन सिंदूर करत १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचा जल्लोष श्रीराम तरुण मंडळ, मर्चंट असोसिएशन व रिपाइंच्यावतीने करण्यात आला.

यावेळी पाकिस्तानचा करायचं काय खाली डोकं वर पाय, पाकिस्तानचा निषेध असो, पहेलगाम हल्ल्याचा बदला घेणाऱ्या भारतीय सैन्यांचा विजय असो, भारत सरकारचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. श्रीराम तरुण मंडळाचे अध्यक्ष अशोक उपाध्ये, रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, मर्चंट असोसिएशन मुन्ना झंवर, शिवसेनेचे सचिन बडदे आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी योगेश ओझा, राजेंद्र नवले, तेजस गायकवाड, संदीप अग्रवाल, प्रविण गुलाटी, राजेंद्र पाटणी, राजेंद्र मुंडे, प्रवीण इंगळे, निलेश बोरावके, अनिल लुल्ला, शशिकांत कडूसकर, राजेंद्र भावसार, विकास कुऱ्हे, बाबासाहेब खाबिया, किशोर परदेशी, अनिल भस्मे, एजाज पठाण, जावेद शेख, अजहर पठाण, विजय मुक्तिया, सचिन कुंभकर्ण, बाळू जैन, शंकर मसालेवाले, विशाल अंभोरे, दिनेश अंभोरे, रमाकांत पाथरकर, जयराम उपाध्ये, अमोल सधानशिव, नाझीम शेख आदी उपस्थित होते.

# शिर्डीत १६ अवैध व्यावसायिकांविरूद्ध कारवाई

## स्थानिक गुन्हे शाखेने केला २ लाख २ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

**शिर्डी (प्रतिनिधी)–** मंगळवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध दारू विक्रेते व अवैध जुगार चालविणाऱ्या इसमांची माहिती काढुन, पंचासमक्ष १६ वेगवेगळया ठिकाणी छापे टाकुन अवैध व्यावसायिकांविरूध्द कारवाई केली. त्यामध्ये शिर्डी पोलीस स्टेशनला महाराष्ट्र जुगारबंदी कायद्यान्वये ७ व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ९ असे एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात २ लाख २ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.



पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना जिल्ह्यामध्ये अवैध व्यावसायिकांवर कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. या आदेशाप्रमाणे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गणेश लोंढे, विशाल तनपुरे, रणजीत जाधव, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ अशांचे पथक तयार करून शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदयाची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना देऊन पथक रवाना केले. पथकाने गुप्त माहितीच्या आधारे वरील कारवाई करून १६ गुन्हे दाखल केले. तर २ लाख २ हजार ३६०रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईचे साईभक्तांनी स्वागत केले आहे.

# श्रीरामपुरात गांजा वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील श्री सिद्धिविनायक मंदिरापासून सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या रोडवर भळगट हॉस्पिटल परिसरात अवैध गांजाची वाहतूक करणारे वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले. वाहनामधून सुमारे चार ते पाच किलो गांजा जप्त करण्यात आला असल्याची प्राथमिक माहिती आहे. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमी दारा मार्फत एका ईरटीका चारचाकी गाडीमधून अवैधपणे गांजाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यांना सिद्धिविनायक मंदिराकडून सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या रोडवर पोलिसांचा सापळा लावून एक वाहन ताब्यात घेतले. सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनांमधून सुमारे चार ते पाच किलो गांजा अवैधपणे वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिसांनी एकास ताब्यात घेतले आहे.




# राहुरीत कृषी सहाय्यकांचे धरणे आंदोलन



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार दि. ५ मे पासून आंदोलनास सुरुवात केली असून यासंदर्भात त्यांनी तालुकास्तरावर तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे.

काल दि. ७ मे २०२५, बुधवार आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणून तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कृषी सेवकांचा सेवक कालावधी रद्द करून सेवकांना नियमित कृषी सहाय्यक म्हणून पदावर घ्यावे, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी असे करावे, सर्व कामकाज डिजिटल स्वरूपात होत असल्याने लॅपटॉप देण्यात यावे, त्याचप्रमाणे कृषी सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषी मदतनीस देण्यात यावा, त्याचप्रमाणे निविष्ठा वाटप करण्यासाठी भाड्याची तरतूद करण्यात यावी व कृषी विभागाच्या आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावी, नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे करताना कृषी महसूल आणि ग्रामविकास विभाग यांना योग्य पद्धतीने जबाबदारीचे वाटप करण्यात यावे आदी प्रमुख मागण्या कृषी सहाय्यकांच्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास १५ मे पासून सर्व योजनांचे काम पूर्णपणे बंद करण्याचा इशारा संघटनेने दिलेला आहे. याप्रसंगी राहुरी तालुक्यातील कृषी सहाय्यक संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रभात अंत्रे इतर पदाधिकारी व तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक यावेळी उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहिल्यानगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976.
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)